पान १ वरुन...

गॅसची टंचाई ! ...

बुधवार (ता.११) रोजी काही प्रमाणात हॉटेल, रेस्टारंट, भोजनालयं आणि बारमधील किचन सुरु राहतील. मात्र उद्या गुरुवारपासून हॉटेल इंडस्ट्रीला इंधनाच्या झळा बसणार आहेत. काही मोठे हॉटेल व्यावसायिक इलेक्ट्रीक शेगड्या, कोळशाच्या भट्ट्या चालवून काही मोजके पदार्थ ग्राहकांना देण्याच्या तयारीत आहेत. मात्र ज्यांची उलाढाल छोटी आहे. इलेक्ट्रीक शेगड्या वगैरे नव्याने बसवणे शक्य नाही. अशांना गॅस सिलेंडर अभावी हॉटेल्स बंद ठेवण्याशिवाय पर्याय राहणार नाही.

सोलापूर शहर परिसरात साधारण ४५० ते ५०० हॉटेल्स, बार आहेत. त्यांच्यासाठी साधारण दररोज सुमारे ६ हजार सिलेंडर लागतात. तेवढा पुरवठा शनिवारपासून होत नसल्याने हॉटेल इंडस्टीमध्ये गंभीर परिस्थिती निर्माण होत आहे. गॅस पुरवठा होणं अवघड बनल्याने सोलापुरातील काही मोठ्या हॉटेल, रेस्टॉरंट मालकांनी पुणे गाठून इलेक्ट्रीक शेगड्या मिळवण्याचा प्रयत्न चालवला. केंद्र सरकारचा मुख्य भर घरगुती ग्राहकांना सिलेंडर्सचा पुरवठा सुरळीत ठेवण्यावर आहे. यासाठी औद्योगिक युनिट्स आणि व्यावसायिक सिलेंडर्सच्या पुरवठ्यात कपात करण्यात आली आहे. हॉटेल इंडस्ट्रीने या निर्णयावर आक्षेप घेतला असून, व्यावसायिक सिलेंडर्स न मिळाल्यास कामकाज ठप्प होण्याची भीती व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने एक महत्वाचा निर्णय घेतला आहे. गॅसचा तुटवडा जाणवू लागल्याने केंद्र सरकारने देशभरात एस्मा अर्थात आवश्यक सेवा पुरवठा अधिनियम कायद्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार (ता.१०) एक उच्चस्तरीय बैठक झाली. त्यात हा निर्णय घेण्यात आला.या कायद्यामुळे आता देशभरात आवश्यक वस्तूंची साठवणूक आणि काळा बाजार करण्यावर प्रतिबंध लागणार आहे. यामुळे जेणेकरुन घरगुती अर्थात गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत राहण्यास मदत होईल. तेल शुद्धीकरण कारखाने आणि पेट्रोकेमिकल कंपन्यांना जास्त प्रमाणात एलपीजी उत्पादन करण्याचे निर्देश केंद्र सरकारने दिले आहेत.

संकट अजून होणार भयावह

गॅस आणि तेलाचा विचार करता, भारत आपल्या गरजेच्या एकूण एलपीजी पैकी ६२ टक्के आयात करतो. शिवाय, तेलावरील त्याचे अवलंबित्व जवळपास ८५ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. अशा परिस्थितीत, जर होर्मुझची सामुद्रधुनी जास्त काळ बंद राहिली तर संकट आणखी वाढेल.भारत सध्या अंदाजे ८५ टक्के गॅस सौदी अरेबियाकडून खरेदी करतो. ही आयात होर्मुझच्या सामुद्रधुनीतून केली जाते, जी सध्या बंद आहे. सरकार सध्या पर्यायी पुरवठा मार्गांचा शोध घेत आहे. भारत दरवर्षी अंदाजे ३१.३ दशलक्ष टन एलपीजी वापरतो. देशाच्या एकूण एलपीजी वापरात घरगुती ग्राहकांचा वाटा ८७ टक्के आहे, त्यानंतर उद्योग, हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सचा वाटा १३ टक्के आहे.

घरगुती सिलेंडरचा तुटवडा भासू नये म्हणून दक्षता...

इराणने होमुर्झची सामुद्रधुनी बंद केल्याने इंधनाचे अनेक टँकर्स समुद्रात अडकून पडले आहेत. त्यामुळे भारतात इंधन टंचाई निर्माण होण्याची दाट शक्यता आहे केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने देशातील सर्व तेलशुद्धीकरण कारखान्यांना प्रोपेन आणि ब्युटेनचा वापर केवळ एलपीजीच्या निर्मितीसाठी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. जेणेकरुन देशातील नागरिकांना घरगुती गॅसचा कोणताही तुटवडा जाणवणार नाही, अशी केंद्र सरकारची योजना आहे.

हजारो टँकर्स अडकून पडले

भारतात दरवर्षी ३१.३ दशलक्ष टन एलपीजी वापरला जातो. त्यापैकी केवळ १२.८ दशलक्ष टन एलपीजीची उत्पादन भारतात होते. याचा अर्थ ५८ टक्के एलपीजी हा आयात केला जातो. त्यापैकी ८५ ते ९० टक्के एलपीजी हा होमुर्झच्या सामुद्रधुनीतून भारतात दाखल होतो. इराण-अमेरिका युद्धामुळे ही सामुद्रधुनी बंद झाल्याने भारताकडे येणारे सर्व गॅसचे टँकर्स समुद्रात अडकून पडले आहेत. सध्या भारताकडे केवळ २५ ते ३० दिवस पुरले इतकाच एलपीजीचा साठा शिल्लक आहे. इराणच्या हल्ल्यात कतारमधील एलएनजी उत्पादनाची केंद्रे ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या माऱ्यामुळे उद्ध्वस्त झाली होती.

गॅस दुकाने आणि गोडाऊनसमोर रांगा

घरगुतीसह व्यावसायिक सिलेंडरची टंचाई लक्षात घेता, सोलापूर शहरासह जिल्ह्याच्या बहुतांश ठिकाणी सिलेंडर घेण्यासाठी ग्राहकांच्या रांगा लागल्याचे चित्र दिसत आहे. घरगुती सिलेंडरचे बुकिंग आता २१ ऐवजी २५ दिवसांनी केलं आहे. त्याशिवाय मागच्या दोन दिवसांपूर्वी घरगुती सिलेंडरच्या दरात ६० रुपयांची वाढ करण्यात आली आहे.

एस्मा कायदा म्हणजे तरी काय?

एस्मा (आवश्यक सेवा पुरवठा अधिनियम) हा कायदा भारतीय संसदेने १९६८ साली मंजूर केला होता. आपत्कालीन काळात आवश्यक सेवा आणि सुविधांचा विनाखंड पुरवठा सुरु राहावा, यादृष्टीने हा कायदा तयार करण्यात आला होता. दैनंदिन वापरात लागणाऱ्या गोष्टी आणि सेवांचा एस्मा कायद्याच्या कार्यकक्षेत समावेश होतो. संपाच्या काळात कामगारांना पुन्हा कामावर रुजू करण्यासाठी या कायद्याचा वापर केला जातो. त्यामुळे बंद आणि कर्फ्यूच्या काळातही कर्मचाऱ्यांना काम करण्यास नकार देता येत नाही.

एस्मा कायद्याच्या कक्षेत कोणत्या सेवा येतात?

सार्वजनिक संरक्षण, स्वच्छता, जलपुरवठा, रुग्णालये आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या संबंधित सेवा एस्मा कायद्याच्या कक्षेत येतात. पेट्रोलियम, कोळसा, वीज, पोलाद आणि खनिज उत्पादन आणि वितरणाशी निगडीत असलेल्या संस्था आणि कंपन्या याशिवाय, बँकिग सेवाही एस्माच्या कार्यकक्षेत येते. सार्वजनिक वाहतूक, दळणवळण आणि खाद्यपुरवठा खरेदी आणि वितरण संबंधित सरकारी संस्थांना एस्मा कायद्याचे पालन करणे अनिवार्य असते. राज्य सरकार स्वतंत्रपणे किंवा अन्य राज्यांच्या मदतीने आपापल्या प्रदेशात या कायद्याची अंमलबजावणी करु शकते.

...तर ७ वर्षांची शिक्षा

या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना सेक्शन ७ नुसार, तीन महिने सात वर्षांची शिक्षा आणि दंड होऊ शकतो. पेट्रोलियम क्षेत्रात एस्माचा उपयोग क्वचितच होतो. यापूर्वी २०२२ मध्ये युक्रेन-रशिया युद्धाच्यावेळी या कायद्याचा वापर करण्यात आला होता . त्यावेळी सर्व तेलशुद्धीकरण कंपन्यांना निर्यात रोखण्याचे निर्देश देऊन देशांतर्गत पुरवठा वाढवण्यास सांगण्यात आले होते.

उद्योग- व्यावसायांवर काय परिणाम होणार?

अत्यावश्यक वस्तू कायदा अर्थात लागू झाल्याने देशातील रासायनिक कंपन्यांवर सर्वाधिक विपरीत परिणाम होऊ शकतो. प्रोपेन आणि ब्युटेन वापरण्यास मज्जाव केल्याने रासायनिक कंपन्यांच्या उत्पादनावर मोठा परिमाण होणार आहे. घरगुती गॅस सिलेंडरची किंमत ६० रुपयांनी वाढली आहे. तर कमर्शिअल एलपीजीसाठी होणारा गॅसचा पुरवठा थांबवण्यात आला आहे. त्यामुळे हे युद्ध आणखी काही काळ सुरु राहिल्यास देशात इंधन टंचाई भीषण होऊ शकते

विधानभवनातून...

महिला कर्मचाऱ्यांना कम अर्ली-गो अर्ली सवलत

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची घोषणा | गैरसोय टाळण्यासाठी निर्णय

मुंबई/प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने विधान परिषदेत प्रस्तावावर झालेल्या विशेष चर्चेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मुंबई महानगर क्षेत्रातील शासकीय महिला कर्मचाऱ्यांसाठी कम अर्ली-गो अर्ली सवलत देण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध असून महिलांना योग्य सन्मान, संधी आणि सुरक्षितता देणारा समाज निर्माण करण्याचा संकल्प अधिक दृढ करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर या निर्णयानुसार मुंबई महानगर क्षेत्रातील महिला कर्मचाऱ्यांना सकाळी ९.१५ ते ९.४५ या दरम्यान कार्यालयात लवकर येऊन जितकी मिनिटे आधी कामकाज करतील, तितकीच मिनिटे संध्याकाळी कार्यालयातून लवकर निघण्याची, म्हणजेच सुमारे ३० मिनिटांची सवलत देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे गर्दीच्या वेळेत महिलांना होणारी गैरसोय कमी होऊन त्यांना दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

हरवलेल्या मुलांचा शोध घेण्यासाठी राज्यात ऑपरेशन मुस्कान मोहिमेअंतर्गत जुलै २०१५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत १४ मोहिमा राबविण्यात आल्या असून ४२ हजार ५९४ बालकांचा शोध घेण्यात आला आहे. तसेच ऑपरेशन शोध मोहिमेतून ५ हजार ६६ महिला आणि २ हजार ७७१ बालकांचा शोध घेण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये मिसिंग सेल कार्यरत असून महिलांच्या समस्यांसाठी ५१ भरोसा सेल सुरू करण्यात आले आहेत.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी लाडकी बहीण, नमो महिला सक्षमीकरण, लेक लाडकी, अन्नपूर्णा आणि लखपती दीदी यासारख्या योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी उमेद मॉल, उमेद मार्ट आणि महालक्ष्मी सरस यांसारखे उपक्रम सुरू करण्यात आले असून बचत गटांची उत्पादने ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरही विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मानधन आणि पायाभूत सुविधांबाबत शासन सकारात्मक असून राज्यातील १७ हजार २५४ अंगणवाडी केंद्रांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यात येत असून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, चर्चगेट आणि बोरिवली स्थानकांवर सायबर गुन्हे रोखण्यासाठी विशेष यंत्रणा उभारण्यात आल्या आहेत.

महिला शासकीय कर्मचाऱ्यांसाठी १८० दिवसांची प्रसूती रजा मंजूर करण्यात आली असून प्रसूती रजेनंतर गरज भासल्यास कमाल एक वर्षापर्यंत अर्धवेतनी रजा घेण्याची परवानगी देण्यात आली आहे. राज्यात चौथे महिला धोरण लागू करण्यात आले असून त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

यावेळी जिजाऊ माँसाहेब, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर आणि महाराणी ताराबाई यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन महिलांच्या सक्षमीकरणासाठी काम करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. महिलांचे सक्षमीकरण हे केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिकदृष्ट्याही तितकेच महत्त्वाचे असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी स्पष्ट केले.

मुलींसाठी आदिशक्ती अभियान

ग्रामीण भागातील महिलांचे जीवन अधिक सुरक्षित आणि सन्मानजनक व्हावे यासाठी आदिशक्ती अभियान राबविण्यात येत आहे. बालविवाह रोखणे, अत्याचारमुक्त गाव निर्माण करणे आणि मुलींचे शाळा सोडण्याचे प्रमाण कमी करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

इंधन दर नियंत्रणासाठी इथेनॉल खरेदी वाढवावी

आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांची मागणी

मुंबई : इराणमध्ये निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती सातत्याने वाढत आहेत. याचा परिणाम देशातील इंधन दरांवर होत असून सामान्य नागरिकांवर मोठा आर्थिक ताण पडत आहे. त्यामुळे इथेनॉलची अधिक प्रमाणात खरेदी करून त्याचा वापर वाढवावा, अशी मागणी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी विधानपरिषदेत केली.

देशातील तसेच महाराष्ट्रातील अनेक साखर कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणात इथेनॉल निर्मिती होत असून त्याचा पुरेसा साठाही उपलब्ध आहे. या पार्श्वभूमीवर तेल कंपन्यांनी इथेनॉलची जास्त प्रमाणात खरेदी करून त्याचा वापर वाढवला, तर पेट्रोल व डिझेलवरील अवलंबित्व कमी होऊन इंधन दरांवर नियंत्रण ठेवणे शक्य होईल. यामुळे साखर उद्योगालाही मोठा दिलासा मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

तसेच राज्यातील अनेक साखर कारखान्यांचे एनसीडीसी संदर्भातील प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचेही त्यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून मांडले. शंकर सहकारी साखर कारखान्याचा प्रस्तावही शासनाकडे सादर करण्यात आला असून या सर्व प्रस्तावांचा सहानुभूतीपूर्वक व तातडीने विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंतीही त्यांनी यावेळी केली.

७.५ एचपीच्या मर्यादेत वीज वापर आणल्यास शेतकऱ्यांना मोफत वीज योजनेचा लाभ

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

मुंबई : मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना ही केवळ ७.५ हॉर्सपॉवरपर्यंत वीज वापर करणाऱ्यांसाठी लागू आहे. शेतकरी ग्राहकांनी आवश्यक उपाययोजना करून वीज वापर ७.५ हॉर्सपॉवरच्या आत आणल्यास त्यांना या योजनेचा लाभ देण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील कृषी पंपधारक शेतकरी मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेपासून वंचित राहत असल्याबाबतचा प्रश्न सदस्य सत्यजित देशमुख यांनी विधानसभेत उपस्थित केला. या चर्चेत सदस्य शेखर निकम यांनी सहभाग घेतला.

शिराळा (जि.सांगली) येथील काही शेतकऱ्यांनी वीज वापर जास्त दाखविल्याची तक्रार केली होती. या प्रकरणी ५२ वीज जोडण्यांची स्थळ तपासणी करण्यात आली. या चौकशीत संबंधित शेतकऱ्यांना दिलेली वीज बिले योग्य असून त्यांचा प्रत्यक्ष वीज वापर अधिक असल्याचे आढळून आले आहे. सध्या या ग्राहकांसाठी स्वतंत्र विशेष दर लागू असून तो सर्वसाधारण दरापेक्षा वेगळा आहे. तरीही संबंधित ग्राहकांना आणखी काही दिलासा देता येऊ शकतो का, याबाबत शासन सकारात्मकपणे विचार करणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ७.५ हॉर्सपॉवरपेक्षा जास्त वीज वापरणाऱ्या ग्राहकांना या योजनेचा लाभ मिळू शकत नाही. कृषी पंपांचे वर्गीकरण हे महावितरणकडून नव्हे तर महाराष्ट्र वीज नियामक आयोग कडून निश्चित केले जाते. यासंदर्भात शेतीसाठी स्वतंत्र वर्गीकरणाचा मुद्दा आयोगासमोर मांडण्यात आला होता; मात्र त्यास मान्यता मिळालेली नाही. तरीही यामध्ये शेतकऱ्यांना काही दिलासा देण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

संजू सॅमसन ठरू शकतो सूर्यकुमार यादवचा उत्तराधिकारी

नवी दिल्ली : टी-२० विश्वचषक २०२६ मधील ऐतिहासिक विजयानंतर भारतीय क्रिकेट वर्तुळात आता आगामी काळातील नेतृत्वाबाबत चर्चा सुरू झाली आहे. भारतीय संघाचा स्टार सलामीवीर संजू सॅमसन हा सूर्यकुमार यादवचा उत्तराधिकारी म्हणून प्रबळ दावेदार ठरू शकतो, असे भाकीत एका माजी भारतीय क्रिकेटपटूने वर्तवले आहे.

सूर्यकुमार यादवने कपिल देव, महेंद्रसिंह धोनी आणि रोहित शर्मा यांच्या मांदियाळीत स्थान मिळवत भारताला चौथे विश्वविजेतेपद मिळवून दिले आहे. मात्र, ३५ वर्षीय सूर्यासाठी २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिक आणि ऑस्ट्रेलियातील टी-२० विश्वचषकापर्यंत तंदुरुस्ती आणि फॉर्म टिकवून ठेवणे हे मोठे आव्हान असेल. तोपर्यंत सूर्या ३७ वर्षांचा होईल, त्यामुळे बीसीसीआय दीर्घकालीन नियोजनाचा भाग म्हणून नेतृत्वात बदल करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शुभमन गिलच्या खराब फॉर्ममुळे निवड समितीला पर्यायांचा विचार करावा लागत आहे. अशातच विश्वचषकात सलग तीन अर्धशतके झळकावून 'मालिकावीर' ठरलेल्या ३१ वर्षीय संजू सॅमसनचे पारडे जड मानले जात आहे. माजी क्रिकेटपटू मोहम्मद कैफच्या मते, संजूकडे नेतृत्व गुण असून त्याच्याकडे दांडगा अनुभव आहे.

पुढचा कर्णधार कोण असेल हे सांगणे कठीण असले, तरी संजू सॅमसन एक उत्तम पर्याय आहे. कर्णधार असा हवा ज्याने जगाचा अनुभव घेतला असेल, जो गोलंदाजीतील बदल आणि खेळाडूंना पाठिंबा देण्याचे कसब जाणतो. संजूने आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सचे नेतृत्व करताना संघाला २०२२ च्या फायनलपर्यंत नेले होते. जर सूर्याने पद सोडण्याचा निर्णय घेतला, तर संजू ती पोकळी भरून काढू शकतो.'

संजू सॅमसनने नुकत्याच संपलेल्या विश्वचषकात ५ सामन्यांत २९९ धावा कुटल्या आहेत. विशेष म्हणजे, आगामी आयपीएल २०२६ मध्ये तो चेन्नई सुपर किंग्स या नवीन फ्रँचायझीकडून खेळताना दिसणार आहे. या हंगामातील त्याची कामगिरी त्याच्या कर्णधारपदाच्या दाव्यावर शिक्कामोर्तब करू शकते.

सूर्यकुमार यादवसाठी कामगिरी महत्वाची

सूर्यासाठी आगामी काळ संघात स्थान टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. २०२५ मध्ये एकाही अर्धशतकाची नोंद त्याच्या नावावर नव्हती. विश्वचषकाच्या सुरुवातीला त्याने न्यूझीलंड आणि अमेरिकेविरुद्ध शानदार फलंदाजी केली असली, तरी उत्तरार्धात आणि विशेषतः अंतिम सामन्यात तो शून्यावर बाद झाला. संघ जिंकल्यामुळे त्याचे अपयश झाकले गेले असले, तरी सातत्यपूर्ण कामगिरीशिवाय कर्णधारपद टिकवून ठेवणे त्याच्यासाठी कठीण जाऊ शकते.

पान १ वरुन...

भाजपची अनपेक्षित अन् ...

वाटचालीची गणितं घालून या पक्षाने जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांच्या निवडीत नव्या समीकरणांचा जन्म घालत निवडीत वेगळाच गेम चालवल्याचे दिसते.

बहुचर्चित आणि प्रतिक्षित सोलापूर जिल्हा परिषदेतील भारतीय जनता पक्षाच्या गटनेतेपदी करमाळ्याच्या रश्मी बागल-कोलतेंची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या मदतीला मंगळवेढ्यातील प्रदीप खांडेकर यांना उपनेतेपदी संधी देण्यात आली आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने ६८ जागांपैकी ३८ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळविले. सोलापूर जिल्हा परिषदेच्या इतिहासात अध्यक्षपदी प्रथमच भाजप सदस्य विराजमान होणार आहे, त्यामुळे जिल्हा परिषदेचा भारतीय जनता पक्षाचा पहिला अध्यक्ष कोण होणार, यावरुन शर्यती लागल्या आहेत.

दीदींच्या सोबतीला उपनेतेपदावर प्रदीपभैय्या

मंगळवेढा तालुक्यातील भोसे गटातून निवडून आलेले प्रदीप खांडेकर यांचेही नाव गेल्या काही दिवसांपासून अध्यक्षपदासाठी पुढे आले होते. मात्र, अध्यक्षपदासाठी चर्चेत आलेल्या खांडेकर यांच्याकडे उपनेतेपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. जिल्हा परिषदेत ते रश्मी बागल-कोलते यांना सहकार्य करतील.

'दक्षिण'चे नेताजी खंडागळे लढवणार पक्षाचा किल्ला

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी जिल्हा परिषद गटातून विजयी झालेले नेताजी खंडागळे यांच्या खांद्यावर भाजपची बाजू मांडण्याची जबाबदारी देण्यात आलेली आहे. जिल्हा परिषदेत काम करण्याबरोबरच त्यांना पक्षाचा किल्लाही लढवावा लागणार आहे.

भारतीय संघासाठी १३१ कोटी रुपयांचे बक्षिसाची घोषणा

अहमदाबाद : भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आपलाच जुना विक्रम मोडीत काढत, टी-२० विश्वचषक २०२६ चे जेतेपद पटकावणाऱ्या भारतीय संघासाठी १३१ कोटी रुपयांच्या भरघोस बक्षीसाची घोषणा केली आहे. २०२४ मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली बार्बाडोस येथे विश्वचषक जिंकला तेव्हा मंडळाने १२५ कोटी रुपये दिले होते.

१३१ कोटी रुपयांचे रोख बक्षीस जाहीर सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली अहमदाबादमध्ये इतिहास रचत भारताने सलग दुसऱ्यांदा विजेतेपद राखले आणि बीसीसीआयनेही आपल्या बक्षीसाचा आकडा वाढवून नवा विक्रम प्रस्थापित केला. बीसीसीआयने प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ मधील भारतीय संघाच्या देदीप्यमान विजयाबद्दल मंडळाने १३१ कोटी रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाला केवळ बीसीसीआयकडूनच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडूनही (आयसीसी) मोठे बक्षीस मिळाले आहे. विश्वविजेत्या भारताला आयसीसीकडून ३ दशलक्ष डॉलर्स (सुमारे २७.४८ कोटी रुपये) मिळाले आहेत. यावेळच्या विश्वचषकासाठी आयसीसीने एकूण १३.५ दशलक्ष डॉलर्सचा विक्रमी बक्षीस निधी ठेवला होता, जो मागील आवृत्तीच्या

सुनील गावसकरकडून सॅमसनच्या फलंदाजीचे कौतुक

मुंबई : भारताचे माजी दिग्गज क्रिकेटर सुनील गावस्कर यांनी संजू सॅमसनच्या फलंदाजीचे तोंडभरून कौतुक केले आहे. संजूच्या खेळात विव रिचर्ड्स आणि महेला जयवर्धने यांची झलक पाहायला मिळाली, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

ते पुढे म्हणाले की, दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पराभवानंतर सॅमसनने भारतीय संघाला सावरले आणि त्यानंतर प्रत्येक सामना 'नॉकआउट' असताना सॅमसनने सलग तीन अर्धशतके ठोकून अवघ्या पाच सामन्यांत प्लेअर ऑफ द टूर्नामेंटचा किताब पटकावला. सॅमसनच्या विस्मयकारक फॉर्मशिवाय भारताला टी-२० विश्वचषक जिंकणे कठीण गेले असते. वेस्ट इंडिजविरुद्ध नाबाद ९७, इंग्लंडविरुद्ध ८९ आणि न्यूझीलंडविरुद्ध ८९ धावांच्या त्याच्या खेळींनी भारताच्या विश्वविजयाचा मार्ग सुकर केला,' असे मतही गावस्करांनी व्यक्त केले.